महाराष्ट्र शासन
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष.
११/१०३९ साकेत पब्लीक शाळेच्या समोर गणेश नगर, गोंदिया
E mail Id- dmmugondia@gmail.com
फोन नं. ०७१८२-२३६६२०

महाराष्ट्र शासन

उमेद

जाक्रं.एमएसआरएलएम /गों./संपा/५५३/२०१७
दिंनाक :- १२/१०/२०१७

संदर्भ - एमएसआरएलएम/गो/संपा/३४०/२०१७ दि. ०७/०७/२०१७

## सडक/अर्जुनी व आमगांव येथे विविध प्रशिक्षणाच्या आयोजनाकरिता जेवण, चहा, नास्ता पुरवठा करण्यास्तव स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघ निवडीबाबत (जाहिरात क्र.२)

राज्यात दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येत आहे. अभियानातर्गत स्वयं सहाय्यता गटासाठी व ग्रामसंघासाठी विविध निवासी व अनिवासी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. या करिता जेवण, चहा, नास्ता पुरवठा करण्यास्तव स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघाकडुन दर निश्चित करुन १ वर्षाकरिता करार करणे आहे. त्याकरिता संदर्भिय जाहिरात प्रकाशित करुन इच्छुक स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघाकडुन अर्ज आमंत्रित करण्यात आले होते. तथापी पुरेशा संख्येत अर्ज प्राप्त झाले नसल्याने सडक/अर्जुनी व आमगांव येथे जेवण, चहा, नास्ता पुरवठा करण्यास्तव खालील प्रमाणे पुन:अर्ज आमंत्रित करण्यात येत आहे.

इच्छुक स्वयं सहाय्यता समुह/ ग्रामसंघ यांनी वर नमुद केलेल्या पत्त्यावरुन किंवा www.zpgondia.gov.in या संकेत स्थळावरुन किंवा www.umed.in या संकेत स्थळावरुन अर्जाचा नमुना प्राप्त करावा. लेखी अर्ज सादर करण्याची अंतीम मुदत दि. २०/१०/ २०१७ दुपारी ३.०० वाजे पर्यंत आहे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. संदर्भिय जाहिरातीच्या अनुषंगाने ज्यांनी अर्ज सादर केलेला आहे त्यांना पुन: अर्ज सादर करणे आवश्यक नाही. अर्जाच्या छाननी नंतर योग्य असणाऱ्या व अभियानाच्या इतर अटी व शर्ती नुसार असलेल्या स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघ यांची यादी निश्चित करुन त्यांच्याकडुन निविदा मागविण्यात येतील.

सेवा पुरवठादारांची यादी निश्चित करण्याचे अधिकार उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाने राखुन ठेवलेले आहेत. अर्ज सादर करण्याच्या मुदतीस बदल झाल्यास त्याबाबतची सुचना जिल्हा परिषद, गोंदिया व जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, गोंदिया च्या सुचना फलकावर आणि www.zpgondia.gov.in व www.umed.in संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी सेवा पुरवठादार यांच्याकडुन कोणतीही निविदा शुल्क व EMD रक्कम घेण्यात येणार नाही.

Dhahare 7/10/17

जिल्हा अभियान संचालक (उमेद) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प.गोंदिया

# अर्जाचा नमुना

प्रति,

मा. जिल्हा अभियान संचालक
उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया

विषय:- विविध प्रशिक्षणाच्या आयोजनाकरिता जेवण, चहा, नास्ता पुरवठा करण्यास्तव स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघ निवडीबाबतची माहिती सादर करण्याबाबत.
संदर्भ- आपली दिनांक रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन मी विविध प्रशिक्षणाच्या आयोजनाकरिता जेवण, चहा, नास्ता पुरवठा करण्यास्तव स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघ निवडीबाबतच्या निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याबाबत लागणारी माहिती खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | स्वयं सहाय्यता समुह व ग्रामसंघ(सेवा पुरवठादार) चा नाव व पत्ता | |
| २ | Pan Card आहे का? | |
| ३ | लागू असलेल्या करप्रणाली अंतर्गत नोंदणी आहे काय? नसल्यास करार करण्यात आल्यास सदर परवाना घेवून ३० दिवसाच्या आत सादर करण्याचे तयारी आहे काय? | |
| ४ | सदर व्यवसाय करण्यास सक्षम प्राधिकारी कडुन नोंदणी/परवानगी/ना हरकत प्रमाणपत्र आहे का? | |
| ५ | बँकेत खाता आहे काय? असल्यास पासबुकची छायाप्रत सोबत जोडावी. | |
| ६ | Food sefty & Standerd Act अंतर्गत परवाना/नोंदणी काय आहे? नसल्यास करार करण्यात आल्यास सदर परवाना घेवून ३० दिवसाच्या आत सादर करण्याचे तयारी आहे काय? | |
| ७ | NRLM NIC Portal वर नोंदणी आहे काय? नोंदणी क्र. नमुद करावे. | |

वर नमुद केलेली माहिती ही बरोबर असल्याची मी खात्री देतो.

स्वयं सहाय्यता समुह किंवा ग्रामसंघाचे नाव---------------------------------

अध्यक्ष/ सचिव यांची स्वाक्षरी व शिक्का

संपर्क क्र.